# बृहन्मुंबई महानगरपालिका

## **करनिर्धारण व संकलन खाते**

क्र.कवसं/२४९२/नविन/२०२४-२५ दि.२०.०३.२०२५

### ★ सूचना पत्र ★

जाहिरात क्र.कवसं/१९१७/एमसी/२०२४-२५ दि.१६.०९.२०२४ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या करनिर्धारण व संकलन खात्यातील निरीक्षक या संवर्गातील १७८ रिक्त पदांकरीता प्रसारित करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने दि.१०.१२.२०२४ रोजी महाराष्ट्र राज्यातील २६ जिल्ह्यात ५० परीक्षा केंद्रांवर निरीक्षक पदाकरीता बाह्य संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेचे सामान्यीकरण दस्तऐवज (Normalization Working Document) आणि परीक्षेचा सामान्यीकरण निकाल (Normalization Result) दि.१०.०३.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

तद्अनुषंगाने परीक्षार्थी आक्षेपांबाबत आणि पुढील भरती प्रक्रियेसंबंधी वरिष्ठ अधिका-यांना e-mail, Whatsapp व दुरध्वनीवर तसेच प्रत्यक्ष कार्यालयास भेट देऊन विविध विचारणा करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

**यास्तव सदर सूचनापत्राव्दारे सर्व परीक्षार्थींना सूचित करण्यात येते की, यापुढे उमेदवारांकडून प्राप्त होणा-या कोणत्याही आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच पुढील भरती प्रक्रियेसंबंधी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/For prospects/Careers-all/Recruitment /Assessment & Collection या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी सूचना पत्रांव्दारे अवगत करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.**

सही/- दि.१८.०३.२०२५

**(डॉ.गजानन बेल्लाळे)**

**करनिर्धारक व संकलक (प्र.)**